Research Article

# ''यादवकालीन महाराष्ट्र व वारकरी संप्रदायचे सामाजिक कार्य

**Birunake Appasaheb Ramchandra**

Sou. Suvarnalata Gandhi Mahavidyalay, Vairag Tal.Barshi.

**सारांश**

मध्ययुगीन अंधारातचाच पडणाऱ्या यादवकालीन महाराष्ट्रातील समाजाला वारकरी संप्रदायने योग्य दिशा दाखविण्याचे कार्य केले. शतकानूशत के हिंदू धर्माच्या चौकटीत गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या बहुजन समाजात आत्म-विश्वास निर्माण करूण आशावादी बनवले. वारकरी संपदायाने समाजात ऐक्य निर्माण करूण मराठी सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी तयार केली.

प्रस्तावना

प्राचीन काळा पासून भारतीय समाजात जाती संस्था (वर्ण व्यवस्था) अस्तित्वात होती. कालांतराने या जाती संस्थेचे विघटन होउन अनेकजाती उपजाती अस्तित्वात आल्या. यादव कालीन महाराष्ट्रातील समाजही याला अपवाद नव्हता 'यादव कालखंडात समृध्दी होती पण सामाजिक व धामिक दृष्टया अवनती झाली होती [1]अनिष्ट परंपरा, वतवैकल्ये वरिष्ठ वर्गाची मिरासदारी बनली होती. शुद्रा नांव स्त्रियांना समाजात कसलेही स्थान नव्हते. यादव कालीन धर्म पंडीतानी जाती संस्था टिकवून ठेवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. हे हेमाड पंत उर्फ हेमाद्री यांनी लिहिलेल्या ''चतुर्वर्ग चिंतामणी या ग्रंथावरून आपल्या लक्षात येते. ब्राम्हणांनी इतर जातीजमातीना आपल्या पासून दूर ठेवून स्वत:चे श्रेष्टत्व वाढविले''[2]

त्या काळी बहुसंख्या जनता खेडयात विखूरलेली होती. पाटील, कुलकर्णी देशमुख, देशपांडे हे वतनदार ग्रामव्यवस्था सांभाळत होते. खेडयातील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय शेती होता. वारोंवार पडणारे दुष्काळ नैसर्गीक आपत्तीमुळे शेतकरी वर्गकर्ज बाजारी झाला होता. जाती संस्थेने घालून दिलेल्या नियमानुसार प्रत्येकजात उदरनिर्वाहासाठी आप-आपला व्यवसाय निमूटपणे करीत होती. गाव कूसा बाहेर राहणाऱ्या शुद्रानां अध्यात्म व शिक्षणाची व्दारे बंद होती. थोडकयात यादव कालखंडात बहूजन समाजाचा कोंडमारा होवून तो आगतिक झाला होता.

समाजामध्ये संयुक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात होती. बालविवाह बहूपत्नित्व व सती पध्दती मुळे स्त्रियांची परिस्थिती दयनीय झाली होती. धर्म शास्त्राने अकाली वैधव्य आलेल्या स्त्री ला तिच्या इच्छे विवरूध्द सरणावर चढविले किंवा जीवंत पणी मरण प्राय यातना सहन करण्यास भाग पाडले. धर्म महत्वाचा की माणूस महत्वाचा या संबंधी योग्य निर्णय घेण्याचे धाडस धर्म पंडीतानी किंवा राज्यकर्त्यांनी दाखविवलेले दिसत नाही.

थोडयाक्यात समाजातील मुठभर लोकांनी धर्माला वेढीसधरून स्व:चा स्वार्थ साधला.त्यानीच सामाजिक विषमतेला व अनिष्ट रूढी परंपरा नांखत-पाणी घातले. सर्व सामान्यांच्या भोळे पणाचा फायदा घेऊन व्यक्ति स्वावंत्र्यावर गदा आणणाऱ्या व्यवस्थेला सुरूगं लावण्यासाठी वेगवेगळे भक्ति संप्रदाय उदयास आले. त्यापैकी महत्वाचा भक्ति संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय''

## वारकरी संप्रदाय उदय व विकास

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील महत्वाचा भक्ति संप्रदाय आहे .या संप्रदायाला वारकरी ,माळकरी किंवा भागवत संप्रदाय या नावाने ओळखले जाते. ''आषाढी, कार्तीकी, माघी किंवाचैत्री वारीलाजे नियमाने पंढरपूरला जातात त्यांना वारकरी म्हणतात. पांडूरंगाला प्रिय असणारी तुळशी माळ धारण करतात त्यांना माळकरी म्हणतात. भगवंताला (विठ्ठल ) आपले सर्वस्व अर्पण करणारा भक्त म्हणजेच भागवंत.[3]

वारकरी संप्रदायच्या उदयाच्या कालखंडा बद्दल मतभेद असलेतरीही संत ज्ञानेश्वरा पासून या संप्रदायाला चालणा मिळाली. संत ज्ञानेश्वर हे यादवकालीन संत होते. या कालखंडात असलेल्या अनिष्ट परंपरांचे चटके संत ज्ञानेश्वराच्या कुंटुंबाला बसले होते.

''व्रत वैकल्ये, यज्ञ याग, कर्म कांडावर समाजातील उच्च वर्गाचा भर होता तर खालच्या समाजाला खऱ्या धर्माचे स्वरुप माहित नव्हते. सर्व धर्म ग्रथ संस्कृती भाषेत होते. ज्ञानाच्या क्षेत्रात मक्तेदारी निर्माण करणारा विद्वान ब्राम्हण वर्ग खरे तत्वज्ञान बहुजनांना सांगण्यास तयार नव्हता''[4] या मक्तेदारी विरूध्द प्रथम संत ज्ञानेश्वरांनी बंड केले. गीतेचा आधार घेवून ज्ञानेश्ववरी हा तत्कालीन मराठीतून ग्रंथ लिहीला. ईश्वर सर्व प्राणी मात्रात असून भक्ति मार्गाने त्याच्या जवळ जाता येते असा उपदेश केला. संन्यास न घेता संसरात राहून ही परमार्थ करता येतो. सदाचार व विठ्ठल स्मरणाने ईश्वर प्राती होते. थोडयाक्यात वैदिक परंपरेतील तत्वाना धक्कान लावता बहुजना नां भक्तिचा मार्ग मोकळा केला.

संत ज्ञानेश्वरानंतर संत नामदेवानी विठ्ठल नामाचा जयघोष पंजाब पर्यंत पोहचाविला यज्ञ कर्म, व्रत वैकल्ये , वर्ण धर्म यांना भक्तिच्या प्रागंणात स्थान दिले नाही म्हणूनच संत जनाबाईं पासूनते संत चोखा मेळा पर्यंत अठरा पगड जातीतील संत वारकरी संप्रदायाची पता काखांदयावर घेवून समतेचा जयघोष करू लागले.

**वारकरी संप्रदायाचे सामाजिक कार्य**

यादवकालीन महाराष्ट्रामध्ये समाजात जाती संस्था अस्तित्वात होती. परंतू संत ज्ञानेश्वरानी भक्तिच्या प्रागंणातवर्णभेदाला थारा दिला नाही. भक्ति करण्याचा अधिकार सर्वा नां आहे हेनमूद करून मानसिक गुलामगीरीच्या कचाटयातून बहूजनां ना सोडविवले. दया, क्षमा , शांती यांच्या जोडीला सत्य , अहिंसा या तत्वांचा स्विकार करून समाजाची नैतिक पातळी उंचावण्याचा प्रयत्न केला. भक्ती कोणाची मक्तेदारी नाही. भाक्तीच्या माध्यमातून ईश्वराजवळ जाता येते अशी शिकवण देवून सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

''आषाढी, कार्ती की वारीच्या वेळी सर्व वारकरी जातीभेद विसरून एकत्र येत त्यामुळे अस्पृश्यता कमी होण्यास मदत झाली. समाजात ऐक्याची भावना वाढीस लागली ''[5] वारकरी संप्रदायाने तळागाळातील जनतेशी त्यांच्याच भाषेतून संपर्क साधल्यामुळे बहुजन समाजात विचार जागृती घडून आली. त्याचा आत्मविश्वस वाढला.

''शुद्र वर्गाला परमार्थीक शिक्षण देवून त्यांचे समाजात महत्व वाढविले त्यांनाही ब्राम्हणांच्या बरोबरचे स्थान मिळवून दिले''[6]वारकरी संप्रदायाने स्त्रियानाही भक्तिचीद्वारे खूली करूण स्त्री पुरूष समानता हे तत्व जोपासले.

**निष्कर्ष**

१. वारकरी संप्रदाय हा राजाश्रायाऐवजी लोकाश्रर्याने वाढला.
२. सर्व सामान्यांच्या मराठी बोली भाषेतून वारकरी संप्रदायाचे तत्व ज्ञान बहूजनापर्यंत पोहचविले.
३. जातीभेदाला थारान देता सामाजिक समता व ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.
४. संसारात राहून परमार्थ साधता येतो हे वारकरी संप्रदायातील संतानी स्वआचरणातून पटवून दिले.
५. स्त्री पुरूष समानता या तत्वाचा पुरस्कार करून पुरोगामी विचार धाराजपण्याचा प्रयत्न केला.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. अकलूजकर लता, प्रा. गरड नामदेव, प्रा.लोखंडे राजेंद्रसिंह - शिवाजी व शिव काल पृष्ट -२२
२. डॉ. देशपांडे अच्यूत नारायण- प्राचीन मराठी वाडमयाचा इतिहास खंड १ पृष्ट- १८३
३. गायकवाड, सरदेसाई , थोरात , हनमाने - मराठे कालीन विचार व संस्था पृष्ट- ९८
४. गोसावी र.रा. -पाच भक्ति संप्रदास पृष्ट -१७८
५. डॉ. देशमूख मा.म- मध्ययुगीन भारताचा इतिहास पृष्ट- २२०
६. न्या. रानडे -मराठी सत्तेचा उत्कर्ष पृष्ट- १३०



**Birunake Appasaheb Ramchandra**
Sou. Suvarnalata Gandhi Mahavidyalay, VairagTal.Barshi.